| MHSN110001222011 | नियमित दिवाणी दावा क्र.२८/२०११<br>सचिन साळुंखे / निवृत्ती साळुंखे |
|---|---|

## निशाणी १३८ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांच्यामार्फत प्रतिवादी क्र.१क यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी असे नमूद केले आहे की, सदर कामातील प्रतिवादी क्र.१क हे दिनांक ३१/१२/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. परंतु हे व्यवसाय व नोकरीनिमित्त परगावी असल्यामुळे त्यांना मुदतीत वारस रेकॉर्डवर घेता आले नाहीत. वादी यांनी मयत प्रतिवादी यांचे वारस अभिलेखावर घेण्यास जाणूनबुजून विलंब केलेला नाही. त्यामुळे, सदरचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब वादीला माफ होवून मिळावा यासाठी प्रस्तुतचा अर्ज देण्यात आलेला आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे देवून असे नमूद केले आहे की, सदरचा अर्ज मान्य व कबूल नाही. अर्जासोबत कोणताही पुरावा नाही. सबब, अर्ज नामंजूर करावा अशी मागणी त्यांनी केलेली आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. उभय पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. याकामी वादी यांना मयत प्रतिवादी क्र.१क यांचे

वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी विलंब झालेला आहे. प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी दाखल करण्यात आलेला आहे. अशा प्रकारच्या दाव्यात मयत पक्षकार यांचे वारस अभिलेवर असणे दाव्याच्या अंतिम निराकरणासाठी आवश्यक आहे. असे न केल्यास विनाकारण गुंतागुंत वाढून प्रकरणांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे, सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. मयत प्रतिवादी क्र.१क यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात येतो.

ASHWINI JOTIRAM BACHULKAR

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2025.07.19 17:06:06 +0530

आटपाडी.

दिनांक : १९/०७/२०२५

(अ. जो. बाचुळकर)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
आटपाडी

*****

## CERTIFICATE

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mr. Ketan Ashok Sargar, (Grade-III) |
| Court | : | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Atpadi |
| Date | : | 19/07/2025 |
| Order signed by the Presiding Officer | : | 19/07/2025 |
| Order uploaded on | : | 19/07/2025 |